# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार


**निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२२/अपील/०१/२०२२/०१५०** **दिनांक-२८.०३.२०२२**

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२८.१२.२०२१ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :११.०१.२०२२ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :११.०२.२०२२ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :२८.०३.२०२२ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०१/२०२२**

**अपीलकर्ता:** श्री. इरफान लुकमान शेख

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २८.१२.२०२१ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २८.१२.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती असमाधानकारक असल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक १०.०२.२०२२ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक ११.०२.२०२२ रोजी प्राप्त झाले)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १४.०२.२०२२ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०४.०३.२०२२ रोजी सुनावणी आयोजीत केली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.




१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुदद्दे खालील प्रमाणे आहेत -

**माहितलेली माहिती:-**

दि.१५.१२.२०२१ रोजी दिलेल्या तक्रार अर्जान्वये जी कारवाई करण्यात आली, जे आदेश पारित करण्यात आले त्या संबंधात माहिती व माहितीच्या प्रति व जावक व आवक पत्रांच्या प्रति देण्यात याव्यात. दि.१५.१२.२०२१ ते आजपर्यंत.

१) विषयामध्ये नमुद तारखेला जी तक्रार केलेली होती (सोबत जोडल्याप्रमाणे) त्या अन्वये जी कारवाई करण्यात आली त्या कारावाईची माहिती, जे आदेश निर्गमित करण्यात आले त्याच्या प्रति व जावक व आवक पत्रांच्या प्रति देण्यात याव्यात.
२) देण्यात आलेले अवैध वरच्या मजल्याचे मिटर हे ज्या खोटया पुराव्यान्वये घेतले त्याबाबत विभागीय पोलीस ठाण्यामध्ये केलेल्या एफआयआर ची प्रत देण्यात यावी.
३) सदर बाबत जर कोणत्याच प्रकारची कारवाई करण्यात आलेली नसल्यास कारवाई न करण्याचे स्पष्टीकरण लिखीत देण्यात यावे.
४) संबंधीत कारवाई ज्या अधिकाऱ्याच्या अखत्यारीत येते किंवा ज्यांनी काम पाहिले त्यांचे नांव, हुद्दा, नियुक्तीचा दिनांक व त्यांचा कार्यालयीन किंवा भ्रमणध्वनी क्रमांक देण्यात यावा.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

आपण दि.१५.१२.२०२१ रोजी दिलेला तक्रार अर्ज दिनांक २२.१२.२०२१ रोजी पुढील कार्यवाही करिता अदानी ईलेक्ट्रीसीटी मुंबई लि. बोरीवली (प) कार्यालयास अग्रेषित केलेला आहे. सोबत कागदपत्रे जोडली आहेत. (एकूण पृष्ठ १)

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

दिनांक २८.१२.२०२१ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४००००५ यांना माहितीचा अधिकार अर्ज केला होता. सदर अर्जा मध्ये मी दिनांक १५.१२.२०२१ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर काय कारवाई केली त्या संदर्भात माहिती मागितली असता मला MERC/ADM/RTI/०६२/२०२१/१००९ Date ११.०१.२०२२ च्या पत्रा सोबत अनु.क्र. १ व ४ चे उत्तर पत्रासोबत देण्यात आले होते. सदर पत्रा मध्ये अदानी ईलेक्ट्रीसिटी मुंबई लि. बोरिवली पश्चिम कार्यालयास अग्रेषित केलेला होता परंतु त्यांनी देखील कारवाई केली नाही व मला समाधान कारक देखील उत्तर अद्याप पर्यंत मला समाधान कारक उत्तर देण्यात आले नाही. सदर उत्तर असमाधान कारक आहे त्या उत्तराने माझे माहितीचे समाधान होत नाही सदर बाबतीत आपण मला जी माहिती अधिकारा खाली माहिती मागितली आहे ती माहिती मिळण्याबाबत तरी मला सदर माहितीची सांक्षांकित प्रत मिळण्यासाठी मी प्रथम अपीलीय अधिकारी यांना अपील करत आहे. सदर माहिती मला शासकिय फी न भरता मला उपलब्ध करून देण्यात यावे तसेच सदर माहिती मला लवकरात लवकर देण्यात यावी.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

अपीलार्थी व प्रतिवादी यांनी नमूद केलेल्या मौखिक निवेदनावरून तसेच अपीलातील मुद्द्यावरून असे दिसून येते कि, अपीलार्थी यांना त्यांच्या माहिती अधिकार अर्जाच्या अन्वये माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.
दिनांक ०४.०३.२०२२ रोजीच्या सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याचे सांगीतले तथापी, मिळालेली माहिती असमाधान कारक आहे असे नमुद केले.

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांचे निवेदन विचारात घेवून सदरहू अपील निकाली काढण्यात येत आहे ते येणे प्रमाणे :-

१) अपीलार्थी यांनी माहिती अर्जात मागीतलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी या कार्यालयात असलेली माहिती / दस्तऐवज उपलब्ध करून दिलेली असून इतर माहिती या कार्यालयासी संबंधीत नाही. करिता, माहिती अधिकारी यांनी दिलेल्या अदेशात हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

वरिल कारण मिमांसेवरून सदर अपील खारिज करण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी हे अत्यावश्यक शासकिय कामाच्या संदर्भाने मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे कोर्टात हजर राहणे तसेच मा. आयोगाच्या अपिल दाखल करण्याकारीता उपस्थित असल्यामुळे सदरहू अपिल ४५ दिवसात निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>**निर्णय**</u>

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. इरफान लुकमान शेख,
४१, जुन, नवीन रूम नं.५९०,
जनता कॉलनी,गिलबर्ट हिल रोड,
अंधेरी (प.), मुंबई - ४०००५८.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**